मंडल आरक्षण

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र. बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक ८ डिसेंबर १९९४.

पहा :-
1. १]शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: बीसीसी-१०६४/प्र.क्र.१११/ज, दिनांक ९ एप्रिल १९६५
2. २]शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: बीसीसी-१०७०/सीआर-जे, दिनांक २३ नोव्हेंबर १९७०.
3. ३]शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: बीसीसी-१०७२/ज, दिनांक २३ मे १९७४.
4. ४]शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-२४१/९३/१६-ब, दिनांक २३ मार्च १९९४.
5. ५]शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्रमांक: सीबीसी-१४९४/प्र.क्र.२३८/मावक-५, दिनांक ७/१२/१९९४.

शासन निर्णय:-

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-२४१/९३/१६-ब, दिनांक २३ मार्च १९९४ अन्वये मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार इतर मागास वर्गीयांना शासकीय, निमशासकीय, तसेच मंडळे, महामंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, सहकारी बँका, शासकीय उपक्रम व शैक्षणिक संस्था इत्यादींच्या सेवेमध्ये खाली उल्लेखिल्याप्रमाणे आरक्षण विहित करण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| अ] विमुक्त जाती [१४ व तत्सम जाती] | ३% |
| ब] भटक्या जमाती [जाने. १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती] | २.५% |
| क] भटक्या जमाती [धनगर व तत्सम जमाती] | ३.५% |
| ड] भटक्या जमाती [वंजारी व तत्सम जमाती] | २% |
| इ] इतर मागास वर्गीय | १९% |

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: बीसीसी-१०६४/१११/ज, दिनांक ९ एप्रिल १९६५ अन्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जातीतील बौद्ध धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती, यांच्याकरिता १३% आणि अनुसूचित जमाती यांच्याकरिता ७% या विहित करण्यात आलेल्या आरक्षणात कोणताही बदल करण्यात आलेला नाही ते तसेच चालू राहील.

३. राज्यात अनुसूचित जाती आणि जमाती म्हणून विनिर्दिष्ट घोषित करण्यात आलेले जनसमुदाय वगळता अन्य काही जाती जमातींकडून सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या तसेच शैक्षणिक दृष्ट्या मागासलेपणाच्या कारणावरून विशेष सवलती देण्याची मागणी होत असते. अशा मागणी विशेषतः अनुसूचित जमातींच्या यादीमध्ये ज्या जमातींचा समावेश करण्यात आलेला आहे अशा जमातींच्या नावाशी साधर्म्य असणाऱ्या जातींकडून प्रकर्षाने होत असते. अशा समुदायामध्ये प्रामुख्याने गोवारी, मन्नेरवारलु, माना, हलबा कोष्टी, मच्छिमार कोळी, सोनकोळी, [illegible] जातींचा समावेश आहे. या जाती आदिवासी जमातीच्या निकषांची परिपूर्तता करीत असल्यास घटनेच्या ३४२(१) व (२) च्या कलमान्वये राष्ट्रपतींना व लोकसभेला या जाती आदिवासी जमातीमध्ये अंतर्भूत करता येतील किंवा कसे याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे. तथापि या जाती सामाजिक दृष्ट्या आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या असल्याने त्यांच्या विकासासाठी काही सवलती अथवा उपाययोजना करणे आवश्यक आहे. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन शासनाने असा असा निर्णय घेतला आहे की, सोबतच्या तक्त्यात नमूद केलेल्या जातींसाठी एक स्वतंत्र वेगळा प्रवर्ग निर्माण करावा व या प्रवर्गाला शैक्षणिक सवलती तसेच शासकीय नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्यात यावे. या जातींच्या प्रवर्गाला "विशेष मागास प्रवर्ग" असे संबोधण्यात येईल व त्यांच्यासाठी २% आरक्षण ठेवण्यात येत आहे. त्यानुसार शासकीय, निमशासकीय तसेच मंडळे, महामंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, सहकारी बँका, शासकीय उपक्रम व शैक्षणिक संस्था इत्यादींच्या सेवा मध्ये हे आरक्षण लागू राहील. पुढे सुधारित आरक्षण खालीलप्रमाणे राहील :-

| | |
|---|---|
| १]अनुसूचित जाती | १३% |
| २]अनुसूचित जमाती | ७% |
| ३]विमुक्त जाती [अ] [१४ व तत्सम जाती] | ३% |
| ४]भटक्या जमाती [ब][जाने. ९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती] | २.५% |
| ५]भटक्या जमाती [क] [धनगर व तत्सम जमाती]. | ३.५% |
| ६]भटक्या जमाती [ड][वंजारी व तत्सम जमाती] | २% |
| ७]इतर मागास वर्गीय | १९% |
| ८]विशेष मागास प्रवर्ग [यादी जोडल्याप्रमाणे]. | २% |

४. वर उल्लेख केलेल्या क्रमांक ८ वरील "विशेष मागास प्रवर्गास" देण्यात आलेले आरक्षण हे सरळ सेवा भरतीसाठी व पदोन्नतीसाठीही अनुज्ञेय राहील. तसेच या प्रवर्गाला क्रीमीलेअरचे तत्त्व लागू होणार नाही. विमुक्त जाती[अ] या प्रवर्गासाठी शासनाकडून अनुज्ञेय असलेल्या अन्य सर्व सवलती देखील वरील विशेष मागास प्रवर्गास अनुज्ञेय राहतील. याबाबतचे आदेश संबंधित मंत्रालयीन विभागांनी स्वतंत्रपणे निर्गमित करावेत.

५. शासन सेवेतील भरती संदर्भात विहित करण्यात आलेल्या १०० बिंदू नामावलीमध्ये वर उल्लेखिलेल्या विशेष मागास प्रवर्गासाठी आरक्षण करून सुधारित १०० बिंदू नामावली निर्गमित करण्यात येईल.

६. हे आदेश दिनांक १ डिसेंबर १९९४ पासून अंमलात येतील.

७. वरील आदेश आदिवासी विकास विभाग, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्ये व क्रीडा विभाग यांच्याशी विचार विनिमय करून निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[शांता शास्त्री]
प्रधान सचिव[सेवा]
महाराष्ट्र शासन.

## परिशिष्ट "अ"

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाच्या शासन निर्णय क्रमांक- सीबीसी-१४९४/प्र.क्र.२३६/मव क-५, दिनांक- ७ डिसेंबर, १९९४ अन्वये विशेष मागास प्रवर्गातील जातींची यादी.

| अ.क्र. | जातींचे नांव |
|---|---|
| १] | गोवारी जात |
| २] | माना जात |
| ३] | [१] कोष्टी [२] हलबा कोष्टी [३] हलबा जात [४] साळी, [५]लाडकोष्टी [६] गढेवाल कोष्टी [७] देवांग [८] सालेवार, [९] पद्मशाली [१०] देवांग [११] कोष्टी [१२] स्वकुळ साळी, [१३] सतसाले [१४] साडे [ १५] जैनकोष्टी. |
| ४] | [१] कोळी तत्सम जाती [२] मच्छिमार कोळी [३] अहीर कोळी [४] सोनकोळी कोळी [५] राजकोळी [६] ख्रिश्चन कोळी [७] ढोर कोळी [८] पानभरे कोळी [९] सूर्यवंशी कोळी. [१०] मांगेला कोळी [११] सोनकोळी [१२] वैतीकोळी [१३] खारवी [१४] नाशिक, धुळे व जळगांव जिल्ह्यातील डोंगर शेती करणारे कोळी. |
| ५] | [१] मुन्नेरवार [२] मुन्नुरवार [३] मुन्नुर [४] तेलगु मुन्नुर [५] मुन्नुरवार तेलगु [६] मुन्नरकापू [७] कापेवार [८] तेलगु कापेवार [९] मुन्नरवाड [१०] तेलगु फुलमाळी, या जाती. |

क्र. आवक/... /१९/कावि- ९९

जिल्हाधिकारी कार्यालय,

रत्नागिरी. दि. ८-२-९५.

दिनांक १५/१२-९५

उपजिल्हाधिकारी अधिकारी

(...)

२/. माहितीसाठी व आवश्यक त्या

[ लोकस सामान्य प्रशासन विभाग यांच्या क्र. बीसीसी १०९४/सीआर-५७/ ९३/१६-ब, दिनांक ५ डिसेंबर, १९९४ च्या "मागासवर्गीयांसाठी आरक्षीत पदे-उमेदवार उपलब्ध न झाल्यास अनारक्षीतपणे पदे भरणे, पदे आरक्षणातून मुक्त करणे" बाबतच्या शासन निर्णयाची प्रत. ]

तातडीचे/महत्वाचे

क्रमांक : एस-१६/१०९४/प्र.क्र.११२/ग-८

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८.१२.१९९४

कक्ष अधिकारी, ई, ई-१, ई-३, ई-६, ई-७, ई-८, ई-१०, फ-४, फ-५, फ-७, फ-८, फ-१, ल-६, ल-७, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
मुद्रांक अधीक्षक, मुंबई,
प्रबंधक महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई.
नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.

यांच्याकडे माहितीसाठी व योग्य त्या तत्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषित.

[ श्री. ग. वाघमारे ]
कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग.

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी
16 JAN 1995

प्रत :- १] स्वीय सहाय्यक, मा. सचिव [मदतकार्य व पुनर्वसन]
२] स्वीय सहाय्यक, मा. प्रधान सचिव [वने]
३] स्वीय सहाय्यक, मा. प्रधान सचिव व विभागीय आयुक्त, [भूकंप व पुनर्वसन ]
४] स्वीय सहाय्यक, मा. प्रधान सचिव [महसूल ]

माहितीसाठी सादर.

मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदे - उमेदवार उपलब्ध न झाल्यास अदलाबदलीने पदे भरणे, पदे आरक्षणातून मुक्त करणे.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-१०९४/सीआर-५७/९४/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ डिसेंबर, १९९४.

पहा :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९१/२५५१/[क]/१६-ब, दिनांक २७ मार्च, १९९१.

प्रस्तावना :-

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०७४/११९/जे, दिनांक ९.४.१९६५ अन्वये मागासवर्गीयांच्या विविध प्रवर्गाकरिता सरळ सेवा प्रवेशाकरिता आरक्षण विहित करण्यात आले होते. त्यामध्ये इतर मागासवर्गीयांकरीता १० टक्के आरक्षण विहित करण्यात आलेले होते, व ते २२ मार्च, १९९४ पर्यन्त अंमलात होते. दिनांक ९.४.१९६५ अन्वये निर्गमित केलेल्या आदेशानुसार इतर मागासवर्गीयांकरिता असलेले आरक्षण भरले न गेल्यास अनुशेष म्हणून दाखविण्याची तसेच ते पुढे ओढण्याची तरतूद न्हवती. त्यामुळे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-१०९१/२५५१/[क]/१६-ब, दिनांक २७ मार्च, १९९१ च्या आदेशानुसार अदलाबदलीने पदे भरताना ती फक्त अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गामधूनच भरण्याची तरतूद आदेशीत करण्यात आलेली होती. मंडळ आयोगाच्या शिफारशीनुसार शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब, दिनांक २३ मार्च, १९९४ अन्वये मागासवर्गीयांच्या ज्या विविध प्रवर्गाकरिता एकूण आरक्षण विहित करण्यात आलेले आहे त्यामध्ये इतर मागासवर्गीयांकरिता एकूण १९ टक्के आरक्षण विहित करण्यात आलेले आहे. या आरक्षित पदांपैकी काही पदे भरली न गेल्यास ती पुढील ५ भरती वर्षे पर्यन्त अनुशेष म्हणून पुढे ओढण्याची तरतूद करण्यात आलेली असून ती अदलाबदलीने भरण्याबाबत देखील दिनांक २३ मार्च, १९९४ च्या शासन निर्णयात तरतूद करण्यात आलेली आहे. त्याच प्रमाणे गुणवत्तेनुसार जे मागासवर्गीय उमेदवार सेवा प्रवेशाकरिता पात्र ठरतील त्यांची गणना आरक्षित पदांवर केली जाईल अशी तरतूद दिनांक २३ मार्च, १९९४ च्या आदेशात करण्यात आलेली आहे.

मागासवर्गीयांसाठी असलेल्या सरळ सेवा भरती तसेच पदोन्नतीमध्ये आरक्षित पदे उमेदवाराअभावी भरली न गेल्यास ती कोणत्या प्रकारे भरण्यात यावीत याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. या गोष्टींचा सर्वंकष विचार करुन शासनाने आता खालील प्रमाणे निर्णय घेतले आहेत. :-

शासन निर्णय. :-

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९१/२५५१/[क]/१६-ब, दिनांक २७ मार्च, १९९४ मधील आदेश अधिक्रमीत करुन खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

सरळ सेवा भरती :

अ] अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, विमुक्त जाती [अ] भटक्या जमाती [ब] भटक्या जमाती [क] भटक्या जमाती [ड] व इतर मागासवर्ग ए [इ] या प्रवर्गाकरिता निर्धारित केलेल्या प्रमाणानुसार भरती करण्यासाठी त्या त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर अशी पदे ५ भरती वर्षापर्यन्त रिक्त ठेवावी व या ५ भरती वर्षात त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध करुन घेण्याचे प्रयत्न करण्यात यावेत. असे प्रयत्न करुनही उमेदवार प्राप्त झाला नाही तर ६ व्या वर्षी खाली उल्लेख केल्याप्रमाणे अदलाबदलीने ही पदे भरण्यात यावीत. ६ व्या वर्षीही त्या प्रवर्गाचा किंवा अदलाबदलीसाठी दुसऱ्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ७ व्या वर्षी खुल्या प्रवर्गाने उमेदवार भरण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेनंतर करण्यात यावी. त्यासाठी आवश्यक त्या समर्थनासहित प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावा. ६ व्या वर्षी पदे खालील प्रकारे अदलाबदलीने भरण्यात यावीत :-

| | |
|---|---|
| अनुसूचित जाती<br>अनुसूचित जमाती | या दोन प्रवर्गातील अदलाबदली करण्यात यावी. |
| विमुक्त जाती [अ]<br>भटक्या जमाती [ब] | [मूळच्या १४ व तत्सम जाती]<br>[मूळच्या २८ व तत्सम जमाती]<br>या दोन प्रवर्गातील अदलाबदली करण्यात यावी. |
| भटक्या जमाती [क]<br>धनगर व तत्सम<br>भटक्या जमाती [ड]<br>वंजारी व तत्सम<br>इतर मागासवर्गीय [इ] | या तीन प्रवर्गात अदलाबदली करण्यात यावी |

ब] शासकीय व जनहितास्तव पद ५ भरती वर्षापर्यंत रिक्त ठेवणे शक्य नसेल तर पद तात्पुरते विनाआरक्षित करण्याचा प्रस्ताव संबंधित विभागाच्या सचिवांच्या स्वाक्षरीसह सामान्य प्रशासन विभागाकडे अभिप्रायासाठी पाठवावे. अशा प्रस्तावावर सामान्य प्रशासन विभागाने अभिप्राय दिल्यानंतर वर्ग-१, व वर्ग-२ च्या पदासंदर्भात प्रस्ताव त्या त्या विभागाच्या सचिवांनी मा. मंत्री, समाजकल्याण व आदिवासी विकास यांच्यामार्फत मा. मुख्यमंत्र्यांकडे सामान्य प्रशासन विभागामार्फत मान्यतेसाठी पाठवावेत.

क] शासकीय विभागातील व विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे तात्पुरत्या स्वरूपात अनारक्षित करण्याबाबतचे प्रस्ताव संबंधित विभागाने सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी सादर करावीत व सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेनंतर विभागांनी मा. मंत्री [स.क.] आणि मा. मंत्री [आदिवासी विकास] यांची मान्यता घ्यावी.

ड] वर नमूद केल्याप्रमाणे अशा सर्व प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेण्यात यावे.

पदोन्नती

[१] अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती[अ]/

आले आहे. शासन निर्णय क्र. बीसीसी- १०७२/जे, दिनांक २२ मे, १९७३ अन्वये त्यासाठी ५० बिंदु नामावली निर्धारित केली आहे. त्याचा अवलंब करावा. या नामावलीत विमुक्त जाती/ भटक्या जमातींचा एकत्रि समावेश करण्यात आला आहे. त्याप्रमाणेच कार्यवाही करावी. या प्रवर्गासाठी निर्धारीत केलेल्या प्रमाणानुसार त्या त्या प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर पद भरण्यासाठी ३ भरती वर्षे प्रयत्न करण्यात यावा व त्या प्रवर्गाची उमेदवार मिळे-पर्यन्त ते पद ३ भरती वर्षे रिक्त ठेवण्यात यावे. तदनंतर ४ थ्या वर्षी अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती या दोन प्रवर्गातून व विमुक्त जाती [अ]/ भटक्या जमाती [ब] या दोन प्रवर्गातूनच आपआपसातून अदलाबदलीने भरण्यात यावे.

[२] प्रशासकीय कारणास्तव किंवा अनिवार्य कारणास्तव आणि पदे संबंधित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्याने तात्पुरत्या स्वरुपात अनारक्षित करावयाचे असल्यास यासंबंधीचा प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागा-मार्फत सामान्य प्रशासन विभागाकडे मंजुरीसाठी पाठवावा. सामान्य प्रशासन विभागाने या पदाचे राखीव स्वरुप तात्पुरते काढून टाकण्यास मान्यता दिली तर एकाद्या [illegible] असलेल्या इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक करुन [illegible] तात्पुरत्या स्वरुपात भरता येतील व त्या त्या गटाची राखीव पदे त्या गटाचा उमेदवार उपलब्ध होईपर्यन्त ४ थ्या वर्षी वर नमूद केल्याप्रमाणे पद अदलाबदलीने भरावे. ४ थ्या वर्षीही अदलाबदलीसाठी मागासवर्गीयांचा उमेदवार उपलब्ध झाला नाहीतर पद कायमचे अनारक्षित झाले असे समजून इतर प्रवर्गातून / खुल्या प्रवर्गाने [पैकी मागासवर्गीयांनी आरक्षित] भरण्यात यावे. यासाठी ही सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घ्यावी.

[३] गट-१ व गट-२ ची आरक्षित पदे तात्पुरत्या स्वरुपात विनार आरक्षित करण्यासंबंधीचे प्रस्ताव योग्य त्या समर्थनासह संबंधित विभागाच्या सचिवांच्या प्रमाणपत्रासह सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायासाठी पाठवावेत व नंतर मा. मंत्री, समाजकल्याण, मा. मंत्री आदिवासी विकास व संबंधित विभागाचे मंत्री यांच्या मार्फत मा. मुख्यमंत्र्यांकडे मंजुरीसाठी पाठवावे.

[४] मंत्रालयीन विभागातील व विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील वर्ग-३ व ४ ची आरक्षित पदे तात्पुरत्या स्वरूपात विनाआरक्षित करण्यासंबंधीचा प्रस्ताव योग्य त्या समर्थनासह संबंधित विभागाच्या सचिवांच्या ज्ञापनासह सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी पाठवावेत.

[५] वर नमूद केल्याप्रमाणे आता प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेण्यात यावेत.

[६] गट-१ व गट-२ च्या निवड सूचीतील मागासवर्गीयांच्या अधिक्रमणास मान्यता देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, मंत्री [समाजकल्याण], मंत्री [आदिवासी विकास] व विभागाचे मंत्री यांच्यामार्फत मा. मुख्यमंत्र्यांकडे अशी प्रकरणे सादर करण्यात यावीत.

[७] ज्येष्ठतेनुसार मागासवर्गीय उमेदवार पदोन्नतीला पात्र असेल परंतु त्याच्या प्रवर्गाचा आरक्षित बिंदू नसेल तर अशा कर्मचाऱ्यास आरक्षित बिंदू नाही म्हणून पदोन्नती नाकारू नये.

## सर्वसाधारण सूचना.

१] राखीव जागेवर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची तात्पुरती नियुक्ती/ पदोन्नती देताना " आपली नियुक्ती/ पदोन्नती मागासवर्गीयांच्या राखीव जागेवर तात्पुरत्या स्वरूपात करण्यात आली असून संबंधित उमेदवार प्राप्त झाल्यानंतर किंवा अनुशेषाने पद भरल्यानंतर आपली नियुक्ती/ पदोन्नती संपुष्टात येईल". असा उल्लेख नियुक्ती/ पदोन्नतीच्या आदेशात न चुकता करण्यात यावा.

२] राखीव जागेवर इतर उमेदवारांची तात्पुरती नियुक्ती/ पदोन्नती दिल्यास अशा उमेदवारांची नोंद राखीव म्हणून बिंदू नामावलीत घेण्यात येऊ नये. त्यांची नोंद तात्पुरत्या स्वरूपातील स्वतंत्र नोंदवहीत घेण्यात यावी. व जसजसे मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध होतील तसतसे त्या नोंदवहीतील नोंदी राखीव स्वरूपी बिंदू नामावलीत घेण्यात याव्यात.

३) सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी जे प्रस्ताव सादर करण्यात येतील ते ते प्रस्ताव संबंधित विभागांनी मागासवर्गीयांच्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्याकरिता नेमण्यात आलेल्या उप सचिवांनी प्रथम तपासून आल्यानंतर विभागाच्या सचिवामार्फत सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावेत.

४) मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखाली असलेल्या क्षेत्रीय कार्यालयातील गट-३ व गट-४ च्या सरळ सेवा भरतीतील व पदोन्नतीतील मागासवर्गीयांचे अनारक्षण / अधिक्रमण प्रादेशिक विभाग प्रमुखांनी सहाय्यक आयुक्त ( मागासवर्ग कक्ष ) यांचे प्रमाणपत्र न चुकता घ्यावे.

५) महामंडळे, मंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शासकीय उपक्रम, जिल्हा परिषद, अनुदानित संस्था, विद्यापीठ, सहकारी संस्था/ बँका, शैक्षणिक अनुदानित संस्था इत्यादीमधील मागासवर्गीयांची आरक्षित पदे तात्पुरत्या स्वरूपात बिगर आरक्षित करण्यासंबंधी संबंधित विभागांनी सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने व मान्यतेने पुढील कार्यवाही करावी.

हे आदेश १ जानेवारी, १९९५ पासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

[ शांता शास्त्री ]

शासनाचे प्रधान सचिव.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/ अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.



क्र. आस्थापना/१/कावि-९७
जिल्हाधिकारी कार्यालय,